अत्यंत महत्वाचे

# मुंबई विद्यापीठ

स्पिड पोस्टाने/हस्तेबटवडा

<u>क्र.वि.क./आयसीसी/२०१४-१५/१०</u>

<u>परिपत्रक</u> :-

प्राचार्य/ संचालक संलग्नित अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था तसेच प्राचार्य,सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, विभाग प्रमुख विद्यापीठ विभाग, उपकुलसचिव पदव्युत्तर पद्वी/आस्थापना/शिक्षक नियुक्ती विभाग, यांना कळविण्यात येते की, शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या त्यांचे क्र.संकीर्ण१११४/प्र.क्र.३०९/विशि-३ दिनांक २५ ऑगस्ट,२०१४ च्या पत्रानुसार शैक्षणिक संस्थामधील प्रवेशामध्ये ESBC व SBC-A या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशाची व शासकीय व निमशासकीय सेवेतील पदभरतीसाठी दिनांक ९ जुलै,२०१४ पासुन किती संवर्गाच्या जाहिराती देण्यात आल्या आहेत व त्यामध्ये ESBC व SBC-A प्रवर्गाच्या किती जागा जाहिरात करण्यात आल्या आहेत याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे कळविले असुन सदर माहिती न्यायालयीन प्रकरणासाठी आवश्यक असल्याने व हे प्रकरण मागास प्रवर्गाच्या आरक्षण धोरणाशी निगडीत असल्याने माहिती तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.

तद्अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागास प्रवर्ग ( ESBC) व विशेष मागास प्रवर्ग (SBC -A) या प्रवर्गातील प्रवेशाबाबतची व सेवेतील पदभरतीची माहिती खालील प्रपत्रामध्ये भरुन त्वरीत उपकुलसचिव, विशेष कक्ष, खोली क १३३,पहीला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट मुंबई- ४०० ०३२. यांना त्वरीत पाठविण्यात यावी तसेच संबंधीत माहिती मुंबई विद्यापीठाच्या, विशेष कक्षाच्या संकेतस्थळावर dr.specialcell@fort.mu.ac.in (in Excel Sheet) वर E-mail करावे.

१. <u>शासकीय व निमशासकीय सेवेतील पदभरतीसाठी दि.९ जुलै २०१४ पासून किती संवर्गाच्या जाहिराती देण्यात आल्या आहेत व त्यामध्ये ESBC व SBC-A या प्रवर्गाच्य किती जागा जाहिरात करण्यात आल्या आहेत.</u>

| विभागांचे नाव | जाहिरातीचा दिनांक | ज्या पदांची जाहिरात दिली आहे त्याचे पदनाम | पदांचा गट अ,ब,व (अराजपत्रित)क,ड | एकूण जाहिरात केलेल्या पदांची संख्या | ESBC प्रवर्गासाठी राखीव दर्शविलेल्या पदांची संख्या | SBC-A प्रवर्गासाठी राखीव दर्शविलेल्या पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

२. <u>शैक्षणिक संस्थामधील प्रवेशामध्ये ESBC व SBC-A या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशांची माहिती.</u>

| अभ्यासक्रमाचे नाव | ESBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशांची संख्या | SBC-A प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशांची |
|---|---|---|
| | | |

दिनांक : १७ सप्टेंबर, २०१४
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे
संचालक
(म.वि.वि.म.)

--------

क.वि.क./ /२०१४ दिनांक : १७ सप्टेंबर, २०१४

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी</u> :-

प्राचार्य/ संचालक संलग्नित अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था तसेच प्राचार्य,सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, विभाग प्रमुख विद्यापीठ विभाग, उपकुलसचिव पदव्युत्तर पद्वी/आस्थापना/शिक्षक नियुक्ती विभाग.

प्राचार्य (डॉ.) राजपाल हांडे
संचालक
(म.वि.वि.म.)